Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4
प्रशांत घोडवाडीकर
ISSN:-2230-7850

Research Papers

# दलितांनवरील अत्याचार आणि मानव अधिकार

***प्रशांत घोडवाडीकर***
सामाजिकशास्त्रे, संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

प्रस्तावना :

मानवाला जन्मापासून मिळालेले हक्क म्हणजेच मानवी हक्क अशी सर्वसाधारण समज आहे. प्रत्येक व्यक्तीला वंश वर्ण लिंग, भाषा, धर्म, राजकीय, किंवा इतर विचारसरणी, राष्ट्रीय अथवा सामाजिक उत्पत्तीस्थान, मालमत्ता जन्म किंवा इतर कोणत्याही दर्जाच्या आधारावर भेदभाव न करता त्याच्या अथवा तिच्या हक्कांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे.मानवी हक्क कायदयाद्वारे मानवी हक्कांची सनदशीर, कायदेशीर मार्गाने हमी दिली गेली आहे. यामुळे मानवी सन्मान ( मानव असल्याचा सन्मान – Dignity) आणि मुलभूत स्वातँय यामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कृत्यापासून/कृतीपासून व्यक्तीचे आणि समूहाचे संरक्षण होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारंपरिक कायदे, करार, कलमे कायदयांची मुलतत्वे आणि इतर कायदयांच्या स्त्रोतांमध्ये मानवी हक्क अभिव्यक्त/व्यक्त केले आहेत.

मानवी हक्क कायदयाने राष्ट्रांना विशिष्ट पध्दतीने वर्तन करण्यास बंधन घातले असून काही विशिष्ट पध्दतीने वर्तन करण्यास बंधन घातले असून काही विशिष्ट उपक्रम (मानवी हक्कांचे उल्लघंन करणारे ) राबविण्यास प्रतिबंध केला आहे.

असे असुनही प्रत्येक व्यक्तीस मानव म्हणून जन्मापासूनच हक्क मिळालेले असल्याने हा कायदा मानवी हक्कांची (नव्याने) प्रस्थापना करीत नाही. व्यक्ती आणि समाजगटांच्या मानवी हक्कांचे अधिकारांच्या उपभोगात हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही कृत्यापासून अथवा सरकारद्वारे दुर्लक्षित कृत्यापासून करार व कायदयाचे इतर स्त्रोत औपचारिक संरक्षण करतात.

### *मानवी हक्कांची महत्वाची वैशिष्टये*

✦प्रत्येक व्यक्तिच्या योग्यतेचा व प्रतिष्ठेचा (Dignity) आदर करणे.
✦वैश्विकता समानतेने आणि कोणताही भेदभाव न करता ते ; मानवी हक्क द्ध सर्वांना लागू आहेत.
✦मानवी हक्क अविभाज्य आणि हिरावता न येण्याजोगे (Inalienable) आहेत. विशिष्ट परिस्थिती वगळता ते हिरावून घेता येत नाहीत. मात्र न्यायालयाने व्यक्तीला गुन्हाखाली दोषी ठरवल्यास स्वातँयाचा हक्क संकुचित करता येतो.
✦मानवी हक्कांचा एकमेकांशी संबंध असून ते परस्परावलंबी आहेत. त्यामुळे एखादया अधिकाराचे उल्लघंन केल्यास त्याचा परिणाम इतर अनेक अधिकारांच्या उपभोगावर होतो.
✦कोणत्याही व्यक्तीस जगण्याचा स्वातँयाचा व सुरक्षेचा मुलभूत हक्क आहे.
✦पुरेशा जीवनमानासह जगण्याचा हक्क
✦मत व अभिव्यक्ती स्वातँयाचा हक्क
✦शिक्षणाचा विचार, स्वातँयाचा आणि सद्सद्विवेक जपण्याचा हक्क व धर्मस्वातँयाचा हक्क आणि
✦कोणत्याही प्रकारचा छळ आणि अवमानकारक वागणूकीपासून संरक्षण

### *भारतीय संविधान*

भारतीय संविधानानूसार देण्यात आलेल्या मुलभूत अधिकारात

***कलम 14 :*** राज्य कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता
अथवा कायदयाचे संरक्षण नाकारणार नाही.

***कलम 15 :*** धर्म, वंश, जात, लिंग, किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई

***कलम 16 :*** राज्याच्या नियंत्रणाखालील पदावरील सेवायोजना किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समानसंधी असेल. धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास या कारणावरून सेवायोजना किंवा पद अपात्र असणार नाही.

***कलम 17 :*** अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निशिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायदयानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला हे सर्व कायदे एक समान लागू आहेत भारतात कायदयांसमोर सर्व समान आहेत पण जातीव्यवस्थेवर समान नाहीत. यामुळे समाजातील विशमता वाढीस लागली भारतीय समाजात दलितांना पाहताना, गरीबी, भुमीहीन, शोशित श्रेणी, ठराविकजाती, अस्पृश्यता व उच्यनिचतेच्या भावनेतूनच पाहिले जाते.

### *दलित म्हणजे कोण ?*

**Please cite this Article as :** ***प्रशांत घोडवाडीकर*** **,**दलितांनवरील अत्याचार आणि मानव अधिकार **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

मराठी शब्द कोशानुसार

***दलित*** : चिरडलेले , चेपलेले, तुडवलेले, दाबलेले, चुरडलेले दळलेले, भरडलेले, अनुसूचित जातीतील, अस्पृश्य, मागास वर्गातील, उपेक्षित पीडित वंचित, (मो.वि. भाटवडेकर ) असा सांगीतलेला आहे.

दलित हा शब्द नविन नसून या शब्दाचा विकास (चळवळीत) हळूहळू होत गेला आहे. माहत्मा फुलेनी या घटकांना अतीशुद्र असे संबोधले तर इंग्रजांनी अनुसूचित जाती असे संबोधले 1930 मध्ये पुण्यात प्रकाशीत झालेल्या Depressed Class ने दलित बंधू या शब्दांचा वापर केला. मा. गांधीनी वापरलेल्या हरीजन या शब्दाला प्रथम बाबासाहेबांनी नंतर दादासाहेब गायकवाड व लोकसभेत मायावतीने विरोध दर्शविला. गांधीनी हा शब्द 17 व्या शतकातल्या भक्तिपंथातील नरसी मेहता या संतकवीकडून हा शब्द उचलला होता. गांधीनी सवर्ण हिन्दुना दलितांसाठी अत्यंज हा शब्द न वापरता 'हरिजन' हा शब्द वापरावा असे आवाहान केले होते. डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यासाठी दलित हा शब्द विशेष लोकप्रिय केला नाही. मात्र त्यांच्या तत्वज्ञानामुळे तो शब्द उभारी घेऊ शकला आणि लोकप्रिय झाला हा शब्द खरे तर नव्यानेच म्हणजे 1960 पासून प्रचलित झाला. मराठी भाषक बुध्दधर्मीय लेखकांनी हरिजन किंवा अस्पृश्य या शब्दाऐवजी आपल्या साहित्यात दलित शब्द वापरायला सुरूवात केली. 1970 च्या दशकाच्या प्रारंभी मुंबईत अनुसूचित जाती आणि सवर्ण हिन्दू यांच्यातील संघर्षा दरम्यान सार्वजनिक जिवनात दलित शब्द सर्वमान्य झाला. दलित पॅन्थर्सनी आपले हक्क आणि आत्मसन्मानासाठीच्या अस्मितेखातर हा शब्द स्वीकारला नंतर दलित हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जाऊ लागला. दलित या शब्दाबद्दल सांगताना डॉ. गंगाधर पानतावणे सांगतात दलित ही जात नसून परिवर्तनाचे प्रतिक आहे. (Source : घनश्याम शहा, मायकेल, कॉच्या ईल्लय्या)

पण आज समाजात दलित म्हणजे केवळ महार, मांग, कधी चांभार यांच्या पुरताच हा शब्द मर्यादीत झालेला आहे. या मागचे कारण या जातीच्या लोकांनीच याचा वापर मोठया प्रमाणात केला आहे. तर त्याच्यासाठीच हा शब्द वापरण्यात येत आहे. घटनेत या शब्दाला कुठलीच मान्यता नसताना, राजकिय नेते, शासन व सर्वच स्तरात याचा मोठया प्रमाणात वापर करण्यात येतो. शासनानेतर यापुढे जाऊन दलित मित्र पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली आहे. (दबल्या कुचल्यांचा मित्र म्हणजे दलित मित्र आणि ज्यांना हा मान देण्यात आलेला आहे ते अभिमानाने आपल्या नावासमोर दलित मित्र असे लिहतात) अलीकडेच उच्च न्यायालयाने दलित शब्द वापरणे घटना विरोधी असल्याचे नमुद केले आहे जर हा शब्द वापरला तर गुन्हा दाखल होऊ शकतो असे असले तरी या शब्दाचा वापर करणे बंद झालेले नाही. ( Note: संबंधीत संशोधन पेपरमध्ये दलित शब्द वापरण्यात येणार नव्हता या शब्दाऐवजी अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती हा शब्दाचा वापर करण्यात येणार होता. पण दलित हा शब्द आज मानसिक शब्द बनला आहे. त्याचमुळे 'दलित' हा शब्द वापरला आहे.)

मराठवाडयातील दलितांची सामाजिक स्थिती बिकट आहे. आजही दलितांकडे चांगले उत्पादन देणाऱ्या शेतजमीनी नाहीत जर असल्यास त्यांचे प्रमाण 2 ते 5 एक्करच्या आतच आहेत ग्रामीन भागातील सर्वच लोकांचे जिवनमान शेतीवरच अवलंबुन आहे. दलित शेतमजुरीसाठी खुल्या वर्गाच्या लोकांच्या शेतातच काम करण्यासाठी जातात शेत मजुरी हेच त्यांचे महत्वाचे उत्पादनाचे साधन आहे. हे रोजगार हंगामी स्वरूपाचे आहे. त्यानुसारच त्यांना रोजगार उपलब्ध होतो. हंगामात दलितांची संपुर्ण कुटूंबे या ठिकाणी शेतात काम करण्यासाठी जातात यातून येणाऱ्या उत्पादनातूनच त्यांचे जिवनमान चालू आहे. ( संशोधनासाठी निवडलेल्या गावातून) ग्रामीन भागातील दलितांची सामाजिक स्थिती पाहता त्यांच्या वस्त्या पंरपरागतच आहेत. त्यांच्या गल्लीत रस्ते नाल्या व्यवस्थीत नाहीत. गावातील इतर समाजातील लोक यांच्या वस्तीकडे घाणपाणी सोडणे व उंकडयात कचरा टाकणे. हे आजही चालू आहे. वाऱ्याने हा कचरा त्यांच्या घराकडे उडत येतो. हा प्रकार जवळपास प्रत्येक गावात आढळतो. ( संशोधनासाठी निवडलेल्या गावातील प्रत्यक्ष पाहणीतून)

National Geographic News च्या अहवालानुसार

- प्रत्येक तासाला दोन दलितांनवर हल्ला होतो.
- प्रत्येक दिवशी 3 दलित महिलांनवर बलात्कार होतात.
- प्रत्येक दिवशी 2 दलितांची हत्या करण्यात येते आणि 2 दलितांची घरे जाळण्यात येतात. (Source: National Geographic Magazine on untouchables)

National Geographic News च्या मराठवाडयातील पाहणीनुसार

- मराठवाडयातील 50ः ग्रामीण दलितांना पिण्यांच्या पाण्याची योग्य सोय नाही.
- 85 : दलितांना उच्चसमाजांच्या जातीच्या घरात प्रवेश नाही.
- 80 : दलितांना मंदिरात प्रवेश नाही.
- 99 : दलितांची मुले ही सरकारी शाळेतूनच शिक्षण घेतात. त्यांच्यासाठी त्या ठिकाणी योग्य वर्ग खोली नाहीत. बसण्याची व्यवस्था नाही. शिक्षक योग्य प्रकारे शिकवत नाहीत. ( Source : National Geographic Magazine on untouchables )

संशोधनासाठी निवडलेल्या नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली गावातील स्थिती जवळपास या अहवाला सारखीच आहे. दलितांनी आजही मंदीरात प्रवेश नाही. जर प्रवेश केल्यास मारहान करण्यात येते ( दलितांमधील कांही जातीचे लोक बाहेरूनच मंदीराचे दर्शन घेतात) गावात दलितांना समानतेचा दर्जा देत नाहीत. लग्न समारंभास व इतर कार्यक्रमास यांना बोलावल्यास सर्वांचे जेवण झाल्यानंतरच बसविण्यात येते. जेवणानंतर जेवलेल्या पत्रावळया यांनाच उचलाव्या लागतात अथवा दलितांपैकी कुणी त्यांच्याकडे कामाला असल्यास तो उचलतो. खुल्या प्रवर्गाचे लोक उचलत नाहीत. ज्या गावात दलित आत्मसन्मानाने जगण्याचा प्रयत्न करतात त्यांना संपुर्ण गावाचा रोश पत्करावा लागत आहे. यामुळे समानतेने जगण्याच्या मानवी हक्कावर गदा निर्माण होत आहे. अत्याचारास सारख्या घटना घडत आहेत.

***दलित अत्याचार***

दलित अत्याचारांच्या घटना या मराठवाडयात केवळ जातीय आधारामुळेच घडत आहेत. मराठवाडयात दलित अत्याचाराच्या घटनां मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या आदोलनाच्या काळात मोठया प्रमाणात घडलेल्या आहेत व आजही अनेक कारणांनी अत्याचारांच्या घटना घडतच आहेत.

संशोधनासाठी निवडलेल्या मराठवाडयातील 4 जिल्हयातील नोंदणी केलेल्या गुन्हांची संख्या

| | | |
|---|---|---|
| नांदेड जिल्हयात | 2000 ते 2008 ऑगस्ट | 342 |
| परभणी जिल्हात | 2005 ते 2008 ऑगस्ट | 131 |
| हिंगोली जिल्हात | 2005 ते 2008 ऑगस्ट | 70 |
| लातूर जिल्हात | 2005 ते 2008ऑगस्ट | 102 |
| | एकूण | 645 |

( Source : नागरी हक्क संरक्षण कायदा विभाग, नांदेड परिक्षेत्र (नांदेड, हिंगोली, लातूर, परभणी भाग्यनगर पोलीस स्टेशन नांदेड)

या अत्याचाराच्या स्वरूपातून पाहता दलितांच्या मुलांची प्रगती, त्यांना मिळणारे आरक्षण, महापुरूषांच्या जयंती प्रस्तापितांना होणार विरोध या कारणातून अनेक वेळा दलितांना लक्ष करण्यात येत

Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.III/April; 2012

आहे. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या शासकिय सवलती पासून वंचित ठेवणे. त्यांच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणे. या अनेक कारणामुळे दलितांनवर अत्याचाराच्या घटना मोठया स्वरूपात घडत आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या गावातील अत्याचाराच घडलेल्या घटनावरून पाहता त्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन कशा प्रकारे होत आहे. केवळ एका विशिष्ट जातीचे म्हणून त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात येत आहे.

1.गोताळा ता. अहमदपूर जि. लातूर या गावाची लोकसंख्या एकुण 987 आहे. त्यात SC- 189, ST-14 ऐवढी संख्या आहे. येथील घटनेचे स्वरूप पाहता या गावात 10 वर्षापूर्वी दलित हत्याकांड घडले होते. त्यात तीन दलित तरूणांना जिवंत ठार मारण्यात आले होते. त्यातील आरोपीना अजन्मकारावासाची शिक्षा झालेली आहे. हे हत्यांकांड जातीय स्वरूपाचेच होते. व त्या हत्याकांडाची छाप आजही गावात आहे. पुन्हा एकदा या गावातील जातीय स्वरूप पुढे येण्याचे कारण म्हणजे या गावातील सरपंचपद हे अनूसुचित जातीची (एससी) महिला करीता राखीव ठेवण्यात आले. पद एस.सी. साठी राखीव झाले म्हणून गावाचा मतदानावर बहिष्कार पडला कारण महार मांगाच्या हाताखाले आम्ही काम करणार नाही. त्यामुळे कुणीच उमेदवारी दाखल केली नाही. या प्रकरणाबदल मोठयाप्रमाणात पेपरबाजी झाल्यानंतर शासनाने भुमीका घेतली. प्रकरण गंभीर स्वरूपाचे जातीय आधारावरच आधारीत होते. त्यामुळे शासनपण हतबल झाले. शासनाला तात्काळ निवडणूका घेता आलेल्या नाहीत त्यामुळे शासनाने (तहसिल कार्यालय अहमदपूर) गावात जाऊन गावातील लोकांचा अहवाल आणला आहे. तो अहवाल पाहता, सर्व लोकांनी दिलेले अर्ज हे एकाच व्यक्तीच्या हाताने लिहलेली आहेत. त्यावर फक्त त्या लोकांनी सहया केलेल्या आहेत. त्यात सर्वांनी एकच कारण सांगीतले आहे की मागील दोन वर्षापासून पाऊस न पडल्यामुळे आम्ही निवडणूका लढवित नाहीत. तसेच एकाचा बाळाची तब्बेत ठिकनसल्यामुळे त्या निवडणूका लढवित नाहीत असे नमुद केले आहे. या अहवाल तहसिल कार्यालय अहमदपूर येथे आहे. त्यागावात शांतता वाटत असली तरी सतत धूसफूस सुरूच असते.

***2.दुसरी घटना***

मार्कड ता.जि. नांदेड येथील

या गावातील बौध्दांचे गावातील सर्वासोबत सर्वांचे चांगले संबंध आहेत. या गावातील जवळपास सर्वांचे दुधांचा व्यवसाय आहे. जातीयता उघडउघड नसली तरी अत्याचाराची घटना घडली आहे. यामुळे दलितांच्या हक्कांवर गदा निर्माण झाली आहे.

या गावातील दलित (पुर्वीचे महार) या सर्व लोकांनी बौध्द जातीचे प्रमाणपत्र काढले आहे. सर्व शासकिय कागदपत्रांचा बौध्द म्हणूनच व्यवहार करतात त्यामुळे गावाचा सरपंच व ग्रामसेवकाने सर्व बौध्दांची नावे अनुसूचित जातीत न नोंदविता खुल्याजातीत नोंदविली आहेत. त्यामुळे गावात अनुसूचित जातीची संख्या कमी झाली. त्याचा परिणाम म्हणून अनुसूचित जातीचे ग्रामपंचायत सदस्यपद कमी झाले. परिणामी अनुसूचित जातीच्या शासकिय योजनांचा लाभ त्यांना भेटत नाहीत. ( उदा. दलित वस्ती सुधार योजना, इत्यादी) या प्रकाराच्या विरोधात या बौध्दांनी सरपंचास विचारल्यास तुम्ही आता बौध्द धर्म स्विकारल्यामुळे खुल्याप्रवर्गांत मोडता तथापी शासकियनियमानुसार नवबौध्दांना सुध्दा सवलती आहेतच या प्रकरणासंर्दभात येथील नागरीकांनी शासनाकडे (नांदेड तहसिल ) पत्र व्यवहार करून देखील आतापर्यंत कुठलाच उपयोग झाला नाही.

या घडलेल्या दोन घटना पाहता केवळ हिंसा मारहान करणेच म्हणजे अत्याचार नव्हे त्यात त्यांच्या मुलभूत हक्कापासून दूरू ठेवणे त्यांच्या मानवअधिकारावर गदा आणणे म्हणजे सुध्दा अत्याचारच होय गोताळ येथील घटनेत जातीय भावनेतून केवळ विशिष्ट जातीचे म्हणून हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न, शासनाचा अहवाल पाहता, निवडणूकांसाठी लोक, घर, शेती, विळुण निवडणूका लढविण्यासाठी वाटेल ते करतात तेच लोक गेल्या दोन वर्षापासून पाऊस पडला नाही म्हणून आम्ही निवडणूक लढवित नाही. हे कारण तथ्य कस वाटेल शासनाचीसुध्दा या अत्याचार संर्दभात घेण्यात आलेली भुमीका सुध्दा अत्याचाराची व मुलभूत हक्कापासून परावृत्त करणारीच आहे. बौध्द जातीचे प्रमाणपत्र काढले म्हणून त्यांचे नाव खुल्याप्रवर्गातून नोंदविल्यामुळे मागासवर्गीयांची योजना बंद झाली शासनदरबारी पत्रव्यवहार करून देखील काहीच होत नाही. या दोन घटना पाहता दलितांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणे म्हणजे दलित अत्याचारासहित मानव अधिकाराचे सुध्दा उल्लंघन होय.

## Source:

1.नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्हातून निवडलेल्या 100 गावातून घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखती?

2.भाटवडेकर मो.वि. “ मराठी पर्यायी शब्दांचा कोष ” साधना प्रकाशन, पुणे, 2000

3.Shinde Premkumar “Dalits and Human Rights” Isha Books, New Delhi, 2005

4.Thorat Sukhadeo, “Dalit In India, Search for a common Destiny ”, sage publication New Delhi 2009

5.सारस्वत अक्षेन्द्र नाथ, “सामाजिक न्याय मानवाधिकार और पुलिस ” राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, 2002

6.रत्तू कृष्ण कुमार “भारतीय दलित और मानवाधिकार जातिवाद और संवैधानिक संरचना ”, बुक एनक्लेव जयपूर, 2002.

7.Michael. S.M. 'Dalit in modern India, vision and values', sage, publication , New Delhi 2007.

8.Shah Ghan shyam Dalits Identity and politics sage publication New Delhi 2001

9.नगरी हक्क संरक्षण विभाग, नांदेड परिक्षेत्र, (नांदेड, हिंगोली, लातूर, परभणी, भाग्यनगर पोलीस स्टेशन, नांदेड

10.मौ. गोताळा, गावातील, प्रकरणातील शासनाचा (अहमदपूर तहसिलचा) अहवाल व ग्रामस्थांची मुलाखत

11.मार्कड येथील नागरिक, बाबुराव नरसिंग, भोरगे व इतर नागरिकांच्या मुलाखती.